# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २६ जुलै, २०१३

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ)** तारांकित प्रश्न.

**(ब)** शुक्रवार, दिनांक १९ जुलै, २०१३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**तीन : सर्वश्री एकनाथराव खडसे-पाटील, सुभाष देसाई, गणपतराव देशमुख, बाळा नांदगांवकर, सुधीर मुनगंटीवार, गिरीष बापट, रविंद्र वायकर, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, नाना पटोले, विनोद घोसाळकर, नितीन सरदेसाई, श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री मंगलप्रभात लोंढा, गोपाळ शेट्टी, सरदार तारासिंह, कुमार आयलानी, योगेश सागर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री प्रविण दरेकर, शिशिर शिंदे, विवेक पंडित, रविंद्र चव्हाण, भिमराव तापकीर, मंगेश सांगळे, प्रताप सरनाईक, राजन विचारे, प्रकाश शेंडगे वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर) :-**

"मुंबईतील धारावी पुनर्विकास योजनेसाठी शासनाने मंजूर केलेले ४ चटईक्षेत्र व रहिवाशांनी ४०० चौ. फुटांचे घर देण्याची मागणी, मुंबईतील विमानतळाभोवतालची २७६ एकर जमीन ८५ हजार झोपड्यांनी व्यापल्यामुळे सुरक्षेचा व त्यांच्या पुनर्वसनाचा निर्माण झालेला प्रश्न, सन २०११ च्या अखेरपर्यंत विकासक एचडीआयएला दिलेल्या ३० ते ४० दशलक्ष चौ.फूट टीडीआरपैकी १.२ दशलक्ष चौ.फूट टीडीआरचा वापर करुनही केवळ २७ हजार २१६ झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन होऊन उर्वरित झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असणे, म्हाडाच्या ५६ वसाहतींचे पुनर्वसन व सोसायट्यांचे अभिहस्तांतरण शासनाची उदासीन भूमिका व भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांमुळे खोळंबून राहणे, मुंबईतील मिठी नदीचे रखडलेलले काम व वाढणाऱ्या अनधिकृत कामाकडे एमएमआरडीएने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, मुंबईतील मोनो व मेट्रो प्रकल्प तसेच पश्चिम रेल्वे द्रुतगती मार्ग (चर्चगेट ते विरार) हा उन्नत मार्ग पूर्ण होण्यात होत असलेला विलंब, तसेच एमएमआरडीए व एमएसआरडीसी यांच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची अपूर्ण कामे व बांधलेल्या उड्डाण पुलांची दुरावस्था, मध्य वैतरणा धरणाच्या खोडाळा पुलाचे काम अपूर्ण असल्यामुळे पाणी साठवणुकीत निर्माण झालेल्या अडचणी, मुंबई, ठाणे व पुणे परिसरात एप्रिल २०१३ मध्ये मुंब्रा, शीळफाटा येथील इमारत दुर्घटनेमध्ये ७४ जणांचा बळी जाऊनही जून महिन्यापासून दि.१४ जुलै २०१३ पर्यंत माहिम, दहिसर, मुंब्रा, भिवंडी, ठाणे, ॲन्टॉप हिल, मुंबई आणि नालासोपारा अशा विविध ठिकाणी विकासक, बांधकाम व्यावसायिक, भू माफिया, शासन व महापालिकांचे संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने अनधिकृतपणे बांधलेल्या अथवा मोडकळीस आलेल्या इमारती आणि झोपड्या कोसळून ३६ हून अधिक जण ठार होऊन झ ालेली जिवित व वित्त हानी, बृहन्मुंबईत सुमारे ३२७ ठिकाणांवर असलेल्या झोपड्यांना दरडीचा धोका असून अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटनादेखील घडलेल्या असणे, तसेच मुंबई

महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात असलेल्या खाडीलगतच्या तिवरांची कत्तल करुन मोठ्या प्रमाणात मातीचा भराव टाकून राजकीय आशीर्वादाने अनधिकृतपणे सुरु असलेली बांधकामे, मोडकळीस आलेल्या इमारती अथवा झोपड्यांमधील रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात अथवा पाठविण्यात येणाऱ्या संक्रमण शिबिरात योग्य त्या सोयीसुविधांचा अभाव असल्यामुळे अशा धोकादायक इमारती व चाळीमधील रहिवाशांकडून त्या खाली करुन देण्यास होत असलेला नकार, परिणामी शासन अवैध बांधकाम व मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांच्या संदर्भात गंभीर नसल्यामुळे भ्रष्ट अधिकारी व विकासक यांच्या संगनमताने बेकायदा बांधकामे वाढीस लागणे, तसेच काही ठिकाणी विकासकाचे हित जपण्यासाठी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार करुन अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांना संरक्षण देणाऱ्या संबंधित अधिकारी, अभियंता, आर्किटेक्ट आणि इमारत मालकांवर कारवाई करण्यास शासनाला आलेले अपयश, दुर्घटनाग्रस्त इमारती व झोपड्यातील मृत अथवा जखमी झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीमध्ये शासनाकडून करण्यात येत असलेला दुजाभाव, परिणामी अशा अनधिकृत व मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये राहणाऱ्या जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने अशा अनधिकृत इमारती अथवा मोडकळीस आलेल्या इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन अशा अनधिकृत बांधकाम प्रकरणी जबाबदार असलेल्या तत्कालीन संबंधित महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर व संबंधित विकासक व झोपडपट्टीदादांवर कठोर कारवाई करण्याची व त्यासंबंधी असलेल्या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्याची व मुंबईत प्रलंबित असलेल्या विविध एस.आर.ए. व पुनर्विकासाच्या प्रकल्पांबाबत शासनाचे धोरण निश्चित करुन नागरिकांना भेडसावत असलेल्या विविध समस्यांवर योग्य त्या उपाययोजना करण्याची आवश्यकता".

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री भाऊसाहेब कांबळे,** अमिन पटेल, हणमंतराव पाटील-बेटमोगरेकर**, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता यावी या उदात्त हेतूने राज्यातील ग्रामपंचायतीसाठी ५ लाखांवरील बांधकामांना तसेच खरेदीकरीता १ लाखावरील रकमेसाठी ई-निविदा प्रणालीचा वापर करावा असा शासनाने निर्णय घेणे, परंतु सदर धोरणांची अंमलबजावणी करताना ई-निविदा प्रक्रिया होत असताना अनेक ग्रामपंचायतीत कामे होऊ नये या हेतूने कमी दराच्या बनावट निविदा भरुन अनेक कामे पूर्ण न होता ठप्प पडल्याचे माहे ऑक्टोबर, २०१२ मध्ये वा त्यानंतरच्या काळात निदर्शनास येणे, तसेच सक्षम नसलेल्या ग्रामपंचायती ई-निविदा प्रक्रिया राबवित नसल्याने अनेक कामे मंजूर असून सुरु न होणे, त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला बसलेली खीळ, याबाबत शासनाने नव्याने धोरण ठरवून राज्यातील ग्रामपंचायत स्तरावरील ई-निविदा प्रणालीचा वापर किमान २५ लाखावरील कामांसाठी करण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(२) **डॉ.अनिल बोंडे**, सर्वश्री विजय वडेट्टीवार, अनिल बावनकर, रामरतनबापू राऊत, हरिदास भदे, बच्चू कडू, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"अमरावती येथे दिनांक १३ जुलै, २०१३ रोजी झालेल्या इतर मागासवर्गीय परिषदेमध्ये मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांमध्ये आरक्षण देण्याला सर्व पक्षीय व सर्व इतर मागासवर्गीय समाज संघटनांच्या नेत्यांनी केलेला तीव्र विरोध, मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांमध्ये आरक्षण देण्याकरिता मा.उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत होणे, मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांमध्ये आरक्षण देण्याकरिता इतर मागासवर्गीयांमधील घटक जातीचा तीव्र विरोध असणे, इतर मागासवर्गीयांची संख्या ५२% असून सुध्दा फक्त २७% आरक्षण देणे, इतर मागासवर्गीयांच्या २७% आरक्षणामध्ये मराठा समाजाचा समावेश करू नये अशी मागणी इतर मागासवर्गीयांमधील घटक जातींची असणे, इतर मागासवर्गीयांच्या विद्यार्थ्यांना १००% शिष्यवृत्ती ऐवजी फक्त ५०% शिष्यवृत्ती मिळणे, एम.बी.ए., बी.बी.ए., एम.सी.ए. सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता इतर मागासवर्गीयांना मिळणारी शिष्यवृत्ती शासनाने बंद करणे, इतर मागासवर्गीयांना दरवर्षी नियमितपणे शिष्यवृत्ती देण्यामध्ये शासन असमर्थ असणे, नॉनक्रिमीलेअरची मर्यादा ९ लाखापर्यंत करण्याची इतर मागासवर्गीयांची मागणी असणे, इतर मागासवर्गीय जातीला विकास महामंडळामार्फत सुलभरित्या कर्ज पुरवठा न होणे, इतर मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थीनींकरिता जिल्हा व तालुका स्तरावर वसतीगृहांची निर्मिती करण्याची आवश्यकता, इतर मागासवर्गीयांसाठी स्वतंत्र घरकुल योजना तयार करण्याची आवश्यकता, इतर मागासवर्गीयांकरिता शैक्षणिक साहित्य गणवेशाचे वितरण होत नसणे, मुस्लिम समाजातील ७२% असलेल्या इतर मागासवर्गीय बांधवांना इतर मागासवर्गीयांचा लाभ न मिळणे, दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे सन १९९५ ते २००१ पर्यंत नोकरीमध्ये रुजु झालेल्या व आता निवृत्त झालेल्या मागासवर्गीय व अनुसूचित जाती/जमातींना जात प्रमाणपत्र पडताळणी सक्तीचे करणे, इतर मागासवर्गीयांवर होत असलेल्या अन्यायामुळे राज्यातील बांधवांमध्ये निर्माण झालेला असंतोष व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री सुधीर पारवे**, देवेंद्र फडणवीस, चंदशेखर बावनकुळे, विजय घोडमारे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"दिनांक २९ जून, २०१२ च्या अधिसूचनेनुसार नागपूर जिल्ह्यात उमरेड कऱ्हांडला येथे वन्यजीव अभयारण्याची घोषणा होणे, अभयारण्याच्या चतु:सीमेवर उमरेड मतदार संघातील मौजा तारणा, विरखंडी, हरदोली, डोंगरमौदा, धामणा, ठाणा, वेळगाव, दहेगाव, रेंगातूर, राजोली, गोठणगाव, ता.कुही, मौजा कऱ्हांडला, देणी, वानोडा, कऱ्हांडला, ठाणा ता.उमरेड व मौजा मरुपार, सालेशहरी, पुल्लर, भोवरी, सोमनाळा, कोलारी, डोंगरगाव, मानोरा, कारगाव, नवेगाव (देश), रानमांगली, तास ता.भिवापूर इत्यादी गावे असणे, सदर गावांपैकी मौजे रानबोडी, ता.कुही या एकमेव गावाच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव असणे, चतु:सीमेवरील सर्व गावातील नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती व मजुरी असणे, अभयारण्यातील हिंस्त्र पशू वारंवार या गावांमध्ये शिरणे, दुभती जनावरे, शेळ्या-मेंढ्यांची शिकार करणे, मौजे चिकना,

ता.कुही येथील सौ.बेबी भगवान गजभिये, सौ.कलाबाई सिध्दार्थ रामटेके व श्री.यादव चिंतामण कुंभले हे ३ नागरिक एकाच आठवड्यात वाघाच्या हल्ल्यात गंभीर जखमी होणे, दिनांक २८ ऑगस्ट, २०१२ रोजी मौजे तारना, ता.कुही येथील सौ.बेबीबाई श्रीराम उईके, वय ५३ या महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू होणे, हिंस्त्र पशुंमुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होणे, शेती करताना अडचणी निर्माण होणे, नागरिकांना जंगलातील तेंदुपत्ता संकलनातून प्राप्त मजुरीपासून वंचित रहावे लागणे, जंगलातील रानमेवा गोळा करण्यावर बंधने येणे, धनगर समाजाला शेळ्यामेंढ्या जंगलात चारण्यास मनाई असणे, नागरिकांच्या रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण होऊन नागरिकांवर उपासमारीची पाळी ओढवणे, अभयारण्यालगतच्या गावांमध्ये केवळ अनुसूचित जमातीमधील कुटूंबांना अनुदानावर एलपीजी गॅस कनेक्शन देण्यात येणे, यावर चतु:सीमेवरील सर्व गावांचे पुनर्वसन, आजच्या बाजारभावाप्रमाणे जमीन व घरांचा मोबदला, तेंदुपत्ता संकलन केंद्र सुरु करणे, वनात दुभती जनावरे शेळ्या - मेंढ्यांना चरण्याची परवानगी देणे, सीमेवरील सर्व गावांतील अनुसूचित जमातीसह सर्व गरीब गरजू नागरिकांना गॅस कनेक्शन उपलब्ध करण्याची कार्यवाही करणे याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**पाच : शासकीय विधेयके :-**

**(१) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१३ चे वि.स. विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) (सुधारणा) विधेयक, २०१३.

---

**(२) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

विधानपरिषदेने संमत केलेले सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

---

**(३) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री एकनाथराव खडसे, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, महादेव बाबर, सुभाष देसाई, सुरेश हाळवणकर, विवेक पंडित, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, सरदार तारासिंह, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री भिमराव तापकीर, विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री धैर्यशील**

**पाटील, प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, रुपेश म्हात्रे, राजन विचारे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री ज्ञानराज चौगुले, विजयराज शिंदे, संतोष सांबरे, चंद्रकांत मोकाटे, विजय शिवतारे, शरद पाटील, राजेश क्षीरसागर, डॉ.सुजित मिणचेकर, श्री.चिमणराव पाटील, श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, सर्वश्री रविंद्र वायकर, विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, भरतशेठ गोगावले, सदानंद चव्हाण, डॉ.खुशाल बोपचे, श्री.नाना पटोले, डॉ.सुधाकर भालेराव, श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, सर्वश्री.प्रकाश शेंडगे, प्रमोद जठार, रविंद्र चव्हाण प्रविण दरेकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३- महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अध्यादेश, २०१३ नापसंत करते."

(ख) **सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, अतुल देशकर, सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.खुशाल बोपचे, श्री.नाना पटोले, श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष देसाई वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अनिल राठोड, विजय औटी, चंद्रकांत मोकाटे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ड) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री नानाजी शामकुळे, विजय घोडमारे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ढ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, प्रा.शरद पाटील, श्री.चिमणराव पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ण) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री बबनराव घोलप, धनराज महाले, अनिल कदम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(त) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राजन विचारे, दौलत दरोडा, रुपेश म्हात्रे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(थ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, भरतशेठ गोगावले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(द) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री आर.एम.वाणी, अशोक काळे, संतोष सांबरे, संजय शिरसाठ, ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ध) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(न) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत ॲड.आशिष जयस्वाल, कॅ.अभिजित अडसुळ, डॉ.संजय रायमुलकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**अशासकीय कामकाज**

**सहा : अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १५ - महाराष्ट्र टोल (वसुलीचे विनियमन) विधेयक, २०१३ - **श्री.एकनाथ शिंदे, वि.स.स. यांचे.**

**(२)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १६ महाराष्ट्र धारण शेतजमिनींचे एकत्रीकरण विधेयक, २०१३- **श्री. नवाब मलिक, वि.स.स. यांचे.**

**(३)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १७ - वीज (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स. यांचे.**

**(४)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १८ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक,

२०१३ - **श्री. मंगेश सांगळे, वि.स.स. यांचे.**

**(५)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १९ - मोटार वाहन (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३ **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(६)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २४ - भारतीय दंड संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**(७)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र लग्न (पैशाची उधळपट्टी व अमर्यादित खर्च यास प्रतिबंध) विधेयक, २०१३ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

**सात : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(सदरहू ठराव बॅलटद्वारा ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आले आहेत.) (क्रमांक १ ते ३)**

**(१) डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १५०**

"भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना, राज्यातील इतर भागातील शेतकऱ्यांना शेतमालाचे आर्थिक नुकसान झाल्यास ज्याप्रमाणे नैसर्गिक आपत्ती म्हणून नुकसान भरपाई देण्यात येते त्याच धर्तीवर धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील धानाचे पुंजणे आकस्मिक जळाल्यावर कोणत्याही प्रकारची आर्थिक नुकसान भरपाई देण्यात येत नसणे, धान उत्पादक शेतकऱ्यांना धानाचे पुंजणे जळाल्यावर नैसर्गिक आपत्ती म्हणून नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३१**

"विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठया प्रमाणावर वीज निर्मिती करुनही विदर्भातच मोठया प्रमाणावर भारनियमन होणे, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगताचे होणारे आर्थिक नुकसान, विजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे, यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भालगत असलेल्या छत्तीसगढ राज्यात उद्योगांना वीज सवलतीच्या दरात उपलब्ध होत असल्याने उद्योग त्या राज्यात जाणे, परिणामी विदर्भाच्या वाटयाला प्रदुषण येवून विकासही न होणे, विदर्भात उत्पादित उद्योगांना सवलतीच्या दराने वीज पुरवठा करण्याची गरज लक्षात घेता तसेच भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री. महादेव बाबर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६५**

"राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर

महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे मोठया प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरामधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदुषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा असणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र "कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ" स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**गत सत्रातील प्रलंबित :- (सूचना क्रमांक १ ते ८)**

(१) **श्री.विजयराज शिंदे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यभरातील देवस्थान इनाम वर्ग ३ च्या जमिनी ज्या इनामदारांना देण्यात आल्या होत्या त्या जमिनी बहुतांश ठिकाणी मूळ इनामदारांकडे नसणे, सदर जमिनीवर इतरांनी अवैधपणे कब्जा केलेला असून काही ठिकाणी तर सात-बारा व महसूल दप्तरात नियमबाहय नोंदी केलेल्या असणे, देवस्थान वर्ग ३ चे मूळ इनामदार यामुळे त्यांच्या हक्कापासून वंचित होणे, त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न, त्यांचेवर उपासमारीची आलेली वेळ, इनामदारांना शासनाचे कोणतेही संरक्षण नसल्याने सद्य:स्थितीत ज्या जमिनी मूळ इनामदार किंवा त्यांच्या कुटुंबियांकडे आहेत त्या जमिनीही हडप करण्याचे इतरांनी चालविलेले प्रयत्न, देवस्थान इनाम वर्ग-३ च्या जमिनीव्यतिरिक्त इतर इनाम जमिनी (जसे देशमुख, देशपांडे, महार व इतर) खालसा करुन शासनाने त्या त्या इनामदारांना किंवा त्यांच्या वारसांना कायमस्वरुपी हक्काने दिलेल्या असणे, त्याचप्रमाणे देवस्थान इनाम वर्ग ३ च्या जमिनी खालसा करुन मूळ इनामदार किंवा त्यांच्या वारसांना कायमस्वरुपी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर येथील गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाबाबत वर्षांनुवर्षे होऊनही कोणतीही प्रगती झाली नाही, त्रुटी दूर करुन सन २००९ मध्ये ७२० कोटी रुपयांचा आराखडा परत सादर करण्यात आला आहे, पी.पी.पी. तत्वावर प्रकल्प राबविण्याचे निश्चित होत आहे, राज्य व केंद्राचा निधी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाची परवानगी व रेस्क्यु सेंटरला सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीची प्रतिक्षा आहे, विदर्भाचा भौगोलिक व वनसंपदेचा विस्तार लक्षात घेता व्यावहारिक दृष्टया यशस्वी होणाऱ्या प्रकल्पाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष."

(३) **श्री. विजय घोडमारे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर शहरातील सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल ट्रान्सप्लांट युनिट ३ वर्षापासून बंद असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, किडणी स्टोनच्या उपचारासाठी असलेले लिथोट्रिप्सी मशिन

तंत्रज्ञाअभावी बंद असणे, मेयो आधुनिकीकरणाची प्रक्रिया मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, या वर्षी मेयोचा अपेक्षित विकास न झाल्याने एम.बी.बी.एस.च्या ४० जागा कायम रद्द होण्याचा संभाव्य धोका टाळण्यासाठी विकास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मेयो प्रशासनाने वैद्यकीय संचालनालयाकडे पत्र देणे, मेडीकल प्रशासन कॅन्सरग्रस्तांच्या बाबतीत उदासीन असल्याने प्रतिक्षा यादी मोठ्या प्रमाणात वाढणे, रेडिओथेरपी तंत्रज्ञांची कमतरता असणे, राज्यात नागपूर येथे एम.डी. रेडिओथेरपी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे, या अभ्यासक्रमाकरिता यंत्र सामुग्रीची पूर्तता केलेली नसणे, संस्थेतील कोबाल्ट यंत्रही जुने झाल्याने क्षमता ५०% पेक्षा कमी झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(४) **श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

" भटक्या व विमुक्त (धनगर) समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गठीत रेणके आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात विलंब होणे, राज्यात धनगर समाजाची लोकसंख्या सुमारे दीड कोटी असून ९०% लोकांकडे हक्काची जमीन नसणे, धनगर समाजाला विकासाअभावी शासकीय योजनांचा फायदा मिळू न शकणे, तसेच कायदेशीर व्यवसाय नसल्याने समाज गुन्हेगारीच्या चक्रात फसणे, धनगर समाज सर्वात गरीब, निरक्षर आणि वंचित घटक असून ९८% लोक बेघर व भूमिहीन असणे, त्यामुळे धनगर समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

(५) **श्री. सुधीर पारवे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर सुधार प्रन्यासाने आरक्षित केलेले भूखंड आरक्षणातून वगळण्याचा अधिकार नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापतींना असूनसुध्दा आरक्षित भूखंड मोकळे केलेले नसणे, नागपूर येथील नो शॉपिंग स्ट्रीट सारख्या अव्यवहार्य योजनांमुळे विकासात निर्माण झालेला अडसर, २२ ले आऊटचा प्रस्ताव प्रलंबित असणे, नागपूर शहरातील ५७२ व १९०० ले आऊट मधील विकास कामे अपूर्ण असणे, अनेक ले आऊटची विकास कामेच सुरु झालेली नसणे, नागरी सुविधांअभावी रहिवाश्यांची गैरसोय होत असणे, नागपूर सुधार प्रन्यासाने वर्षभरात गुंठेवारी अंतर्गत एकही अभिन्यास मंजूर न करणे, वर्धा रोडवरील गैरकृषी वापराची परवानगी गावठाणापासून ७५० मीटरवर देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री. रविंद्र वायकर, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

" सूरजकुंड (हरियाणा) मेळाव्याच्या धर्तीवर राज्यात देखील सूरजकुंडसारखा सर्व सुखसोयीनी युक्त असा शिल्पग्राम प्रकल्प राबविण्याबाबत मौ.मजासगाव ता.अंधेरी येथील न.भू.क्र.१९०/ब मधील मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेला भूखंड महामंडळाकडे वर्ग करण्याबाबत दिनांक ३१ जुलै, २००७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना विनंती करणे, उक्त जमिनीचे मनोरंजनाचे मैदान (आर जी) म्हणून असलेले आरक्षण बदलून ते शिल्पग्राम करणेबाबतचा प्रस्ताव महामंडळातर्फे दिनांक २४ ऑगस्ट, २००७ रोजीच्या पत्रान्वये नगरविकास विभागास सादर करण्यात येणे, या योजनेसाठी १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार निधी प्राप्त झाल्याचे २९ ऑगस्ट, २००७ रोजीच्या पत्रान्वये कळवूनही अद्याप जागेच्या आरक्षणाबाबत कोणताच निर्णय झालेला नसणे, सदर जमीन अद्याप

महामंडळाच्या ताब्यात मिळालेली नसल्यामुळे पुढील कार्यवाहीस विलंब होणे, उपरोक्त प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होवून तीन-चार वर्षाचा कालावधी उलटूनही केवळ जागेअभावी शिल्पग्रामचे काम अद्यापही प्रलंबित असणे, सदर प्रकल्पाचे काम तातडीने सुरू होण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. सुधीर पारवे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील ओ.बी.सी आणि व्ही.जे.एन.टी. विद्यार्थ्यांना पोस्टमॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे सुमारे ११०० कोटी रुपये शासनाने वितरित न करुन विद्यार्थ्यांवर अन्याय केल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, केंद्र शासनाद्वारे राज्य शासनाच्या माध्यमातून दिली जाणारी ही शिष्यवृत्ती मागील दोन वर्षांपासून प्रलंबित असणे, ओ.बी.सी. आणि व्ही.जे.एन.टी. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वितरित करण्यात सरकार जाणूनबुजून विलंब करीत असून हळूहळू ही योजना बंद करण्याचा शासनाचा कट उघड होणे, केंद्र शासनाने दिनांक ११ ऑगस्ट, २०११ रोजी राज्याला कळविलेल्या निर्णयानुसार शिष्यवृत्तीचे नवे दर तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. तथा बी.सी.सी.ए. तसेच इतर नवे अभ्यासक्रम त्याच्यामध्ये समाविष्ट करण्यात आले असले तरी राज्य शासनाने या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, ओ.बी.सी. नॉन क्रिमीलेयरची उत्पन्न मर्यादा ७ लाख रुपये करण्याबाबत तसेच ई.बी.सी. सवलतीकरिता उत्पन्न मर्यादा ४.५० लाख इतकी करण्याकरिता वारंवार मागणी होत असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री. प्रकाश शेंडगे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"धनगर आणि भटक्या विमुक्त जाती व जमाती यांना एसटीच्या सवलती लागू कराव्यात यासाठी विविध आयोग स्थापन करण्यात येणे, या आयोगाने आपले अहवाल देणे, कालेलकर आयोग, बापट आयोग, अग्रवाल आयोग आदी आयोग असणे, अग्रवाल आयोगाची मुदत दिनांक ३० मार्च, २०११ रोजी संपणे, या आयोगाने गेल्या ६ वर्षामध्ये कोणत्याही बैठका न घेणे, केंद्र शासनाने घोषित केलेल्या अनुसूचित जमातींच्या महाराष्ट्र राज्याच्या यादीत धनगर समाजाचा समावेश असणे, तथापि समावेश करताना धनगर या शब्दातील 'र' या अक्षराऐवजी 'ड' या अक्षराचा चुकीने वापर करणे, त्यामुळे राज्यातील धनगर समाज अनुसूचित जातीच्या सवलतींपासून वंचित राहणे, या समाजाला एसटीच्या सवलती त्वरित लागू कराव्यात यासाठी अनेक संघटनांनी वारंवार राज्याच्या प्रत्येक जिल्हयामध्ये, मुंबईमध्ये मोठेमोठे मोर्चे काढून सरकारकडे निवेदन दिलेले असणे, राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्री यांचेकडे यासंबंधीचे सर्व पुरावे सादर केलेले असणे, यामुळे राज्यातील धनगर आणि भटक्या विमुक्त जाती व जमाती या संवर्गामध्ये राज्य शासनाविरोधी तीव्र असंतोष पसरलेला असणे, परंतु याबाबतीत आजतागायत निर्णय न लागणे, याकडे राज्य शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने करावयाची तातडीने कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,

दिनांक : २५ जुलै, २०१३. महाराष्ट्र विधानसभा.